ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | १ धर्माची आवश्यक्ता आणि व्याख्या<br>२ आर्यधर्माचा इतिहास |
| लेखक | : | धनुर्धारी |
| प्रकाशक | : | जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १८९६ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

१

धनुर्धारीविरचित—

# स्वधर्मज्ञानपुस्तकालय.

## १ धर्माची आवश्यकता आणि
## २ व्याख्या.

महादेव गुर्जर बुकसेलर आणि
रामवाडी
मुंबई.

किंमत अर्धा आणा.

हातजोडून प्रार्थना:—या अत्यंत कष्टमय संसारयात्रेंत आपल्या भाषाबंधूंच्या वांट्यास हटकून सुख येईल अशी खात्री वाटते, त्या विषयाची पुढील चार पानांत थोडीशी चर्चा करण्याचा प्रयत्न करून पाहिला आहे. सर्व स्थावरजंगमात्मक-अखिलचराचर-विश्वांचा नियामक, हा हेतु तडीस नेण्याची प्रेरणा वाचकमित्रांत करो ह्मणजे झाल्या श्रमांचें चांगलें चीज होईल. धनुर्धारी.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

# १ धर्माची आवश्यकता.

**सुखाचें साधनः**—मनुष्यप्राण्याचा सारा आयुःक्रम—जन्माच्या ठिकाणापासून मरणाचा पल्ला गांठी तोंपर्यंतचा प्रवास—एका हेतूनें ओतप्रोत भरलेला असतो. आपणांस सुख मिळेल ही **इच्छा** आणि आज नाहीं पण उद्यां तरी तें सुख मिळेल ही **आशा** या दोहींच्या जिवावरच मनुष्यमात्राच्या साऱ्या उड्या आहेत; किंबहुना तसा प्रकार नसता तर जगांत राहावें असें कोणालाही वाटतेंना; आणि जन्मसार्थक व जीवितसाफल्य "सुख" "सुख" ह्मणून धडपडण्यांत वाटतें ह्मणूनच तर ही जगाची रहाटी चाललेली आहे. आतां सुख ह्मणजे काय? सुख कोठें असतें किंवा सुख कशाला ह्मणावें याचा निर्णय होणें कल्पांतींसुद्धां शक्य नव्हे; कारण सुख हें सापेक्ष आहे आणि सुख ह्मणजे जें काय आहे तें शब्दकोशांतच, असाही विनोदी निराशतेचा पण व्यावहारिक **सत्य सिद्धांत** कैक ज्ञात्यांनीं ठरविलेला आहे. किंवा तें कसेंही असलें तरी तृप्ति हें सुखाचें निवासस्थान होय असें मानण्याला प्रतिबंध दिसत नाहीं. आणि ही तृप्ति धर्मावरील श्रद्धा आणि ईश्वरावर भरंवसा असल्याशिवाय दृष्टीस पडणें परम दुर्घट आहे.

**निराशाबीजः**—शिवाय सांप्रत ज्ञात असलेल्या जगांतील तमाम देशांच्या अंतःस्थितीचा बारीक विचार करूं लागलों तर आपणाला सकृद्दर्शनीं असें आढळून येतें कीं, ऐहिक संपत्तीचा केवळ अतिरेक, सोई व साधनें यांचें पराकाष्ठेचें वैपुल्य यथेच्छ असतांही धर्म कीं, जो ईश्वरसंबंधी ज्ञान करून देणारा

सद्गुरु, याची असावी तितकी कुमक नसल्यामुळें व पाठिंबा नाहीं ह्मणून समाधान किंवा तृप्ति यांना पूर्णपणें मुकावें लागत आहे. ह्मणजे अर्थात् सुखास आंचवणें त्यांना भाग पडतें. इंग्लंडसारख्या धनकनकसंपन्नतेच्या अत्युच्च शिखरांवर पोंचलेल्या आणि श्रम न पडतां किंवा अत्यल्प श्रमानें साध्य अशा नाना साधनांची अत्यंत समृद्धि असलेल्या देशांतील अतिश्रीमान् उदमी व्यापारी किंवा इतर उद्योगरत अशांस तृप्ति कशी ती ठाऊक नाहीं, असा प्रकार झालेला आहे. त्याप्रमाणें पदरीं गरीबी यास्तव "बंड" बनून सार्वजनिक स्वास्थ्याच्या मुळावर कुठार हाणण्यास प्रवृत्त होणारा "आनर्किस्ट" "निहिलिस्ट" अशा टोळ्या निर्माण होताहेत व कांहींची निराशतेला वश होऊन आत्मघाताकडे प्रवृत्ति वळते. याचें कारण काय हें वर सांगितलेंच आहे कीं, ईश्वर आणि त्याची ओळख करून देणारा धर्म यांची कांस सुटत चालली हें होय.

**उदात्तवृत्ति व कृति कशी होईलः**—आणखीं मनुष्यमात्राच्या खऱ्या कर्तव्याची व्याख्या ह्मणजे "सुख वाढविण्याप्रीत्यर्थ प्रयत्न" ही होय. आणि याच दृष्टीनें पाहतां जन्मास आल्याचें सार्थक करणारे अनेकविध महात्मे, योद्धे, कवि, साधुसंत, कल्पक, देशभक्त व राज्यकार्यधुरंधर, दाते व कनवाळू, गुरु व अध्यापक अशांच्या मुळांशीं आणि अचाट व भगीरथ अशा प्रयत्नांच्या मुळांशीं त्यांचा धर्मावरील विश्वास आणि ईश्वराचा भरंवसा आहे हें कोणालाही आणि कदापि नाकबूल करितां यावयाचें नाहीं. ह्मणजे ईश्वर व धर्म यांच्या व्यतिरिक्त आपला देह स्वजनकल्याणार्थ खर्चीं घालण्याची त्यांना स्फूर्ति झाली नसती. धर्मलंड अर्थात्, ईश्वरास बाजूला झुगारणाऱ्या कोणत्या माईच्या पूतानें आपलें नांव स्वजनमंडळींत किंवा इति-

ह्यासांत अजरामर करून ठेविलें आहे हें कोणी दाखवील काय? ह्मणून ह्मणावयाचें तें इतकेंच कीं, योद्ध्यांचें शौर्य, कवींची स्फूर्ति, कार्यधुरंधरांचें राज्यकौशल्य, देशकैवाऱ्यांची स्वजनसेवा, साधूंचा धर्मोपदेश, गुरूंची अध्ययनतत्परता किंवा एकंदरींत उदात्तकृतीचें अवलंबन सर्वथा धर्म आणि ईश्वर यांच्या विश्वासावरच असावयाचें. या सिद्धांताला अपवाद मिळणें केवळ मुष्कील होय[१].

**कर्तव्यः**—यास्तव मनुष्यजन्माचें सार्थक आणि मनुष्यमात्राचें खरें, योग्य व एकच जें कर्तव्य कीं, सुखाची अभिवृद्धि करण्याप्रीत्यर्थ झटणें, तें बजावणें असेल तर धर्म व ईश्वर यासंबंधानें होईल तेवढा जास्त परिचय स्वजनमंडळीस करून देऊन तो जास्त दृढ करण्याची खटपट करावयास हवी.

## २ व्याख्या.

**स्वधर्माश्रयः**—आतां अनेक धर्म, नाना पंथ, ईश्वरसंबंधाच्या भिन्न समजुती, असा घोंटाळा पुष्कळ आहे व या भानगडींत पडावयास इच्छिणें ह्मणजे अफाट जलधी उपसीत बसणें होय. यास्तव ज्या धर्माच्या आश्रयानें कैक पिढ्या आपल्या पूर्वजांनीं काढिल्या, ज्या धर्मांत आपण जन्मलों व वा

१ इंग्लंडचे सुप्रसिद्ध सरजार्ज मेकंझी ह्मणतात " धर्मलंड अशीं माणसें कदापि राज्यकार्यधुरंधर व्हावयाचीं नाहींत." आणखी एक पटाईत व्यवहारशास्त्रज्ञ ग्रंथकार एके ठिकाणीं ह्मणतो "माझी खात्री आहे कीं, धर्माला धाब्यावर बसविणारे गृहस्थ कुशल कारागीर, उत्कृष्ट कवी आणि सज्जन नागरिक असे कदापि होणार नाहींत." प्रख्यात मुत्सद्दी ग्लॅडस्टन साहेब ह्मणतात "धर्मतत्वाचा ठसा चांगला मनावर उमटला नाहीं अशा राष्ट्राची सुधारणाच मुळीं शक्य नाहीं" लार्ड रिपन व डा. हंटर यांचेंही असेंच मत आहे.

ढलों, व जो धर्म आपला असें आपले पूर्वज शतकांनुशतकें ह्मणत आले, त्याच धर्माचा आश्रय केला तर त्यांत गैर तें कोणतें आहे? **"स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः"** ह्मणजे आपल्या धर्मांतलें मरण पत्करलें, पण परधर्म नको; तो अत्यंत भयावह होय, असें सर्वधर्मरहस्यसारभूत भगवद्गीतेंत श्री भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें आहे.

**स्वधर्माचें अज्ञानः**—पण सध्यां आमच्या देशांत या धर्माला ग्लानि आणि तीही बऱ्याच जोराची येत चालली आहे, थोडीबहुत आली आहे व आहे हा क्रम असाच चालला तर आणखी जास्त येणार, याबद्दल कांहीं शंका नाहीं. हजार पेंढाऱ्यांच्या टोळयांस आणि शेंकडों वर्षांत न लुटतां येई इतकी आमची संपत्ति न्याय्य व राजरोस रीतीनें आणि आह्मांला खुष ठेवीत इंग्रज आपल्या देशांत नेताहेत, आमच्या येथील संपत्तीचा पाट सारखा तिकडे धो-धो वाहत आहे, तथापि न लुटतां येई अशी आमची अपार परमार्थज्ञानजन्यशांतिसमाधानसंपत्ति मुबलक आहे तोंवर आमचें जिणें इतकें कष्टमय वाटावयाचें नाहीं. परंतु सांप्रतकाळीं भयंकर औदासिन्य व ईश्वराची ओळख झपाट्यानें बुजत चाललेली अनेक अनर्थ ओढविण्यास कारणीभूत होईल यांत मात्र संदेह नाहीं. तरुण पिढीला स्वधर्मशिक्षणाचा अगदीं विटाळ आहे असेंच नव्हे, तर धर्म तुच्छ मानणें कैकांच्या कौतुकास अथवा शाबासकीस पात्र झालेलें आहे.

परधर्मीयांच्या आचारविचारांचा सारखा व्यासंग, तज्जन्य संस्कार आणि स्वतःच्या धर्माकडे दुर्लक्ष्य किंबहुना तिरस्कार हें तरुण पिढीचें मुख्य लक्षण बनलें आहे. शिवाय पाद्री * मंडळी

---

* एका अतिविद्वान् आणि पूर्ण अनुभवी अशा सरकारी आंकडेशाळ्यानें पांच सहा वर्षांखालीं या देशांतील मिशनरी मंडळीस

अहर्निश कपाळीं ओरड करीतच आहे. राजाश्रय आमच्या धर्माला नाहीं किंवा समाजवर्तनावर सरकारचा दाब उदासीन किंवा स्वावलंबी असा आहे. याचा परिणाम एव्हांपासूनच सरकारच्या नजरेस येऊं लागला आहे आणि आह्मां प्रजाजनांला तर दिसतोच आहे. खरें सौख्य, योग्य कीर्ति आणि उत्तम नीति धर्माशिवाय अन्यत्र मिळणें अशक्य अशी सर्व जगाची अत्यंत प्राचीनकाळापासून पुऱ्या अनुभवानें खात्री पटली आहे. तरी आह्मी त्या धर्माकडे जाणून बुजून दुर्लक्ष करितों, याचें कारण स्वधर्माचें ज्ञान असावें तसें व तितकें नाहीं हें होय. शिवाय आमचा धर्म ह्मणजे चांगला पांच सहा हजार वर्षांपासून चालत आलेला व वैदिक, पौराणिक आणि रूढी या तीन अवस्थांतून पार पडलेला; आणि बौद्ध, महमद, ख्रिस्ती आणि आधुनिक समाज यांच्या वैरांतून निभावलेला असा आहे. मात्र इतकेंच कीं, जुनाटपणामुळें शेंदूर फांसलेल्या मारुतीच्या नाकाची जागा व डोळ्यांची खूण सांपडेना अशी होते त्याप्रमाणें मूळचें शुद्ध रूप कोणतें व नवें कधीं, कसें आणि किती शिरलें वगैरेचा कांहींच थांगपत्ता लागत नाहीं. आणि त्यामुळें हवें तेवढें विराट स्वरूप धर्माला आलेलें आहे. ह्मणून कोणाला कांहीं स्वधर्मस्वरूप पाहीन ह्मटलें तर घोंटाळून जाण्याखेरीज अन्य कांहीं साधन नाहीं असें झालें आहे. हिंदुधर्म ह्मणजे अठरा धान्यांचें कडबोळें असें कोणी ह्मणूं लागला तर नव्हे असें साफ उत्तर देण्याला हिम्मत चालत नाहीं अशी अज्ञानामुळें

---

प्रार्थना केली कीं, "भाईनो, सांप्रत हिंदुधर्माच्या कडेनें जाणारे असे सुमारें चार पांच कोटि लोक आहेत, त्यांस खटपट करून तुह्मी एकदांचे आपल्या कळपांत ओढा कसे?" यावरून आह्मीं पुष्कळ शिकण्यासारखें आहे.

सध्यां स्थिति आलेली आहे; शिवाय आलीकडे "धर्म" या नुसत्या शब्दाचा कैवार घेऊन बखेडा माजविणारे किंवा धर्माच्या लटक्या बढाईवर अभिमान व्यक्त करणारे पुष्कळ आहेत. पण "आपला धर्म" ह्मणजे कोणता ? त्याचा इतिहास कसा आहे ? त्याला स्थित्यंतरें किती आलीं ? त्याच्या आज्ञा काय आहेत त्यांचा कोणीच कांहींएक विचार करीत नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे.

**धर्मज्ञानाचा यत्न**:—यास्तव स्वधर्मज्ञान या सदराखालीं आमच्या धर्माचा आजपर्यंतचा इतिहास, आमच्या धर्मांतील भिन्न मतांचीं मूलतत्वें, पंथांचे स्थापक, त्यांची दिशा, इत्यादि सर्व थोडक्यांत असें वाचकांस सादर करावें असा उद्देश आहे. अमुक पंथ चांगला, तमका निरुपयोगी वगैरे भानगडींत न पडतां सर्व पंथ व सर्व मतें आहेत तशीं सादर करावयाचीं हाच क्रम सध्यां प्रशस्त वाटतो.

पण या उद्योगास यथावकाश, यथामति व यथाशक्ति लागण्याच्या पूर्वी **धर्म** याची व्याख्या काय आहे व आजकालच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील धर्माचार्यांनीं धर्माच्या व्याख्या कशा केल्या आहेत हें सांगण्याचा प्रयत्न करणें आवश्यक वाटतें. ह्मणून आधीं धर्म याच्या व्याख्या सादर करून मग वर आंखल्याप्रमाणें स्वधर्मज्ञान सांगण्याच्या प्रयत्नास लागावयाचें आहे.

**धर्म ह्मणजे काय?**—आपण धर्म हा शब्द मुख्य धर्म याखेरीज कर्तव्य, पुण्य, स्वभाव आणि कृपा या चार अर्थांनीं उपयोगांत आणितों. हिंदुधर्म फार प्राचीन आहे; आईबापांच्या आज्ञा मानणें मुलांचा धर्म (कर्तव्य) होय; धर्म (पुण्यदान) हा इहपरलोकीं सुखावह आहे; चुन्याचा संयोग होतांच तांबडा रंग स्वीकारणें हळदीचा धर्म (स्वभाव) होय; आणि 'धर्माला

(कृपा करून) आतां जास्त बोलूं नका' या वाक्यांत धर्म हा शब्द किती भिन्न अर्थानें वापरण्यांत येतो हें कळून आलेंच असेल.

पण आपणाला जो धर्म याचा अर्थ घ्यावयाचा आहे तो निराळा आहे. यास्तव धर्माच्या व्याख्या कशा करण्याचा सांप्रदाय आहे हें दाखविल्यानें धर्म ह्मणजे काय याची आपोआप फोड होईल. या धर्माच्या व्याख्या एकाच देशांतील किंवा एकाच व्यक्तीच्या सादर केल्या नाहींत. त्याचप्रमाणें खालीं दिलेल्या व्याख्यांत कोणती विशेष ग्राह्य आहे किंवा कोणत्या कारणानें अग्राह्य अथवा ह्या व्याख्येवर शंका प्रतिशंका घेण्यास किती व कशी जागा आहे याच्या भानगडींतही पडण्याचें प्रयोजन नाहीं इतकें सांगणें अवश्य वाटतें. कारण, आमच्या मंडळींत (१) धर्माची जिज्ञासा व आवड असणारे, (२) धर्मसंबंधीं पूर्ण औदासिन्य पत्करणारे, आणि (३) अगदीं धर्मलंड असे तीन तऱ्हेचे लोक असून त्यांत जुन्या तऱ्हेचे व नव्या दमाचे असे पोट तट आहेत. तेव्हां इतक्यांच्या शंकासमाधानाच्या नादांत पडणें सध्यांच नको आहे.

१. धर्माचा अर्थ सन्मान व पूज्यबुद्धि, असें इंग्रजींतील धर्मसंबंधी शब्दाच्या व्युत्पत्तीवरून सिद्ध होतें.

२. साधी भक्ति आणि आज्ञाधारकपणा अशी धर्माची प्रारंभिक व्याख्या रोमन लोकांची असे.

३. धर्माचें शास्त्र आणि पूजा हाच धर्म असेंही कोणी कोणी ह्मणतात.

४. औपपत्तिक नियमांचें आणि नितितत्वांचें आपल्या बुद्धीनें केलेलें ग्रहण असाही धर्म याचा अर्थ आहे.

५. "कांहीं मतें, नियम आणि आचार शिकविण्याकरितां एकाच्या आज्ञेनें केलेला संग्रह" असाही अर्थ धर्म याचा आहे.

६. ईश्वराची ज्ञानप्राप्ति आणि त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या पूजादिकांचा पंथ यालाच धर्म ह्मणावें, असा रोंख ख्रिस्ती धर्मशास्त्राचा आहे.

७. जगन्नियामक शक्ति अशी धर्मासंबंधानें फ्लीडर याची समजूत आहे.

८. ईश्वरी-मन व ईश्वरी-इच्छा यांला डाक्टर मार्टिनो धर्म ह्मणतो.

९. आपल्या अंत होणाऱ्या वासना अनंताच्या स्वाधीन करणें हाच धर्म, असें केअर्डचें मत आहे.

१०. धर्माचें खरें पहिलें स्वरूप ह्मणजे वासनेचा नाश झाला पाहिजे, असें फिच् नामक नास्तिकाचें ह्मणणें आहे.

११. ईश्वरास ओळखणें त्याला धर्म ह्मणतात, अशी गोएथची व्याख्या आहे.

१२. आपण करीत असतों ती चिंतनिका—मनन—आपल्या हातून घडतें तें आचरण इत्यादिकांत आपण ईश्वरास जबाबदार आहोंत असें वाटतें ती बुद्धि ह्मणजे धर्म, असें उदात्त विचारी ख्रिस्त साधूंचें मत आहे.

१३. मनुष्यमात्राचीं एकंदर कर्तव्यें केवळ ईश्वरीआज्ञा होत आणि ईश्वर आपल्या दरोबस्त कृत्यांचा नियामक असें वाटणें यालाच धर्म ह्मणावा, असें कांटचें मत आहे.

आणि तोच विद्वान् गृहस्थ असें सांगतो कीं, नीतिसंबंधानें दुर्लक्ष्य करून नीतीचें दृढीकरण न होण्याचा संभव नाहीं. अशा शुष्क व बाह्य उपचारांच्या योगानें ईश्वरप्रसन्नता संपादूं पाहणें याला धर्म ह्मणतां येत नाहीं. तो धर्माचा मूर्खपणा होय!

१४. आपल्या वासना ईश्वराच्या स्वाधीन करणें, इच्छा, प्रवृत्ति आणि संकल्प यांचा सन्यास, ऐहिक सुख आणि हित

यांच्या हेतूंचे व्यापार, यांचा त्याग व स्वतःच्या इच्छांचा ईश्वरी-योजनेंत मिलाफ करणें याचें नांव धर्म, असें केर्ड याचें मत आहे.

१५. ईश्वराचा व्यापकपणा आणि मनुष्य व ईश्वर यांचा संबंध या ज्ञानाचा धडा शिकविणारा धर्म, ही मार्टिनोची व्याख्या आहे.

१६. भय उत्पन्न होई अशी मनोवृत्ति आणि ईश्वरावर अवलंबून राहणें, उत्तम आहे तिकडे प्रवृत्ति, साधें वर्तन यांची जोड देणारा धर्म असें लोटस ह्मणतो.

१७. पूज्यबुद्धि उत्पन्न करणारा तो धर्म.

१८. ईश्वराच्या श्रेष्ठत्वाविषयीं ज्ञान करून देत त्याजवर प्रीति जडविणें हें धर्माचें लक्षण असें स्पिनाझो ह्मणतो.

१९. धर्म ह्मणजे ज्ञान—आणि स्वतःचें स्वरूप कळून शंकांचें समाधान व मनाची शांति-पवित्रता देणें हें धर्माचें मुख्य लक्षण आहे. ( फिच् )

२०. सृष्टी व मनुष्य ईश्वरानें व्यापित आहेत हीं समजून सांगणारा धर्म.

२१. धर्म ह्मणजे ईश्वर जाणणें आणि त्याची प्रीति कशी संपादावी याचें ज्ञान.

२२. परमात्म्याची भक्ति आणि आपली त्याच्या ठिकाणीं सायुज्यता याचें ज्ञान दृढ करणारा धर्म.

२३. धर्म ह्मणजे ज्ञानाचा मार्ग.

२४. धर्म ह्मणजे अनुभव.

इतक्या धर्मसंबंधी व्याख्या पुरे आहेत. यांवरून धर्माची योग्यता केवढी आणि आवश्यकता किती आहे याचें सहज अनुमान होईल. तथापि जास्त ठसण्यासाठीं धर्माची महती ग्रूप नामक विद्वानानें येणेंप्रमाणें गाइली आहे. तो ह्मणतो—

(अ) धर्माच्या योगानें मनुष्यमात्राला सुख प्राप्त होतें इतकेंच नव्हे, तर कुटुंब किंवा राजा यांनीं घालून दिलेल्या नियमांच्या योगानें मनुष्यांत एकप्रकारची शक्ति असते तिजपेक्षां किती तरी जास्त सामर्थ्य धर्माच्या योगानें उत्पन्न होतें.

(आ) भिन्न भिन्न लोकांत एकवटपणा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य धर्माच्या अंगीं फार चांगलें असतें ह्मणून या एकवटपणाच्या योगानें त्यांचा व्यवहार एकमेकांच्या सहाय्यानें व सहाय्याच्या आशेनें बराच सुखावह होतो.

(इ) धर्माच्या योगानें दरिद्री व पंगू–अवयवहीन–अशांचें दुःख फार हलकें होतें. कारण, येथें नाहीं दुसरे ठिकाणीं, या जन्मीं नाहीं पुढील जन्मीं तरी आपणांस सुख होईल अशी त्यांना आशा असते व ह्यामुळेंच आपला दुःखभार ते निमूटपणें सोशितात व आहे त्या स्थितींत संतुष्ट राहतात.

(उ) नीति आणि कायदा यांना चांगली बळकटी धर्माच्या योगानें येते.

(ऋ) श्रीमंत लोकांचा हेवा आणि त्यांची सुखानें नांदणूक, हीं धर्माच्या योगानें गरीबांत उत्पन्न होणाऱ्या संतुष्टतेवरच अवलंबून असते.

(ऌ) मरण ह्मणजे कःपदार्थ असें मनांत ठाम बिंबविण्याचें काम धर्मासारखें इतरांच्या हातून व्हावयाचें नाहीं.

(ए) सर्व सत्कृत्यांचें मूळ धर्मावरील भक्तींत आहे असा सर्वत्र अनुभव येतो, ह्मणून लोकोत्तर कृत्यें करविण्याला कारण धर्म असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

आतां आमच्या आर्यधर्माचार्यांच्या व्याख्या सादर करावयाच्या; पण पुढें लौकरच निरनिराळ्या मतांच्या प्रस्थापकांची साद्यंत हकीकत येणार आहे ह्मणून द्विरुक्तीचा प्रसंग टाळ-

ण्यासाठीं तो भाग येथें मुद्दाम वगळला आहे. शिवाय आमच्या चांगल्या पदार्थांची वाखाणणी परदेशच्या लोकांनीं त्यांतून विशेषतः प्रभुवर्गीयांनीं–इंग्रजांनीं–केली तरच कोठें आह्मांला त्या आमच्या चांगल्या गोष्टींकडे नुस्तें कोठें पाहण्याचा तरी यत्न करावा असें वाटतें, एरवीं कांहीं एक आमचें आह्मांला स्वतः कळत नाहीं. असा अनिष्ट काळ दैवदुर्विलासानें सध्यां आह्मां आर्यांच्या नशीबीं आलेला आहे. **भगद्गीतेसारख्या** अनुपम ग्रंथाची बरोबरी करणारा ग्रन्थ अन्य कोणताच नाहीं. असें इंग्रज ग्रंथकार ह्मणूं लागले. ह्मणजे मग आह्मांला वाटतें कीं, पाहावें ही **भगद्गीता** आहे तरी काय चीज ह्मणून.

अस्तु मुख्य सांगण्याचें तें इतकेंच कीं:—

**१ स्वधर्माची कांस बळकट धरणें यांत खरें सुख आहे.**

**२ स्वधर्माच्या योगानें मनाला शांति-आणि समाजाचें कल्याण झाल्यावांचून राहत नाहीं.**

**३ स्वधर्मनिष्ठ असणाऱ्यांतूनच लोकोत्तर पुरुष निर्माण होतात. आणि धर्माखेरीज मनुष्यमात्राच्या सुखाला दुसरा तरणोपाय नाहीं आणि जन्मास आल्याचें सार्थक धर्मनिष्ठ असणें यांतच आहे.**

एवढें तरी आमच्या **तरुण पिढीनें चांगलें हृत्पट्टिकेवर खोदून ठेवावें.** आर्यधर्माचा इतिहास वगैरे विषय पुढील पुस्तकांत येईल.

सर्वांचा कल्याणेच्छु,

धनुर्धारी.

मुंबईः—"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

२

धनुर्धारीविरचित—

# स्वधर्मज्ञानपुस्तकालय.

## आर्यधर्माचा इतिहास.

महादेव गुर्जर बुकसेलर आणि

रामवाडी मुंबई.

**किंमत अर्धा आणा.**

मे सन १८९६.

**हात जोडून प्रार्थनाः**—या अत्यंत कष्टमय संसारयात्रेंत आपल्या भाषाबंधूंच्या वांट्यास हटकून सुख येईल अशी खात्री वाटते, त्या विषयाची पुढील चार पानांत थोडीशी चर्चा करण्याचा प्रयत्न करून पाहिला आहे. सर्व स्थावरजंगमात्मक-अखिलचराचर-विश्वांचा नियामक, हा हेतु तडीस नेण्याची प्रेरणा वाचकमित्रांत करो म्हणजे झाल्या श्रमांचें चांगलें चीज होईल. धनुर्धारी.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

# स्वधर्मज्ञानपुस्तकालय.

## आर्यधर्माचा इतिहास.

धर्म ह्मणजे काय, व धर्माची आवश्यकता किती ह्या दोन्हींचा विचार पहिल्या पुस्तकांत झाला. आतां आपल्या देशांतील, धर्माचा इतिहास सांगणें ओघानेंच आलें आहे. तो, अगोदर अर्वाचीन शोधकमताचे दिग्दर्शनानें कथन करितों.

**१ वैदिक काळ.**–हल्लीं पामीरचें मैदान ह्मणतात त्या ठिकाणच्या आसपास कांहीं लोक राहात असत. पण तेथें लोकवस्ती दाट झाल्यामुळें उदरनिर्वाहाच्या सोयी अर्थात् आकुंचित झाल्या आणि त्यामुळें अन्य ठिकाणीं कोठें तरी सोयी पाहणें त्या लोकांना भाग पडलें. तेव्हां त्यांतील कांहीं लोक हिंदुकुश पर्वताच्या वाटेनें हल्लीं हिंदुस्थान या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या देशांत वसाहत करण्यासाठीं आले. व त्यांचा मुक्काम सप्तसिंधु–(हप्तहिंदु असा त्याचा पुढें अपभ्रंश झाला त्या)–नदीच्या तीरीं प्रथमतः झाला. वसाहतीसाठीं आलेल्या या लोकांनीं आपणांस **आर्य** ह्मणजे **श्रेष्ठ** असें ह्मणण्याचा पाठ ठेविला. ते आपल्या भाषेला **संस्कृत** ह्मणजे **साफसूफ केलेली** असें ह्मणत. हे लोक ज्या मुलखांतून आले त्याला **बाम-ए-दुनिया** ( जगताचें माहेर )असें आजमितीला सार्थ नांव आहे. **आर्य** लोक या देशांत वसाहतीस आले त्यावेळीं येथें **दस्यु, राक्षस, पिशाच** लोक राहात असत. असें शोधकांचें मत आहे.

आपणांस आर्य ह्मणविणारे लोक स्वभावतः मोठे हुशार, बुद्धीनें चांगले चलाख व कृषीवलविद्येंत पूर्ण निष्णात असे असत.

**२ आर्यांच्या पुरातन धर्मसमजुती:–आर्य** ह्मणविणाऱ्या या लोकांचा सर्व निर्वाह कृषीवल उद्योगावरच असे, यामुळें

**आकाश, वायु, प्रकाश** व **सूर्य** हे आपल्या सुखदुःखाचें कारण, अशी साहजिकपणें त्यांची समजूत असणें शक्य आहे. यामुळें त्यांच्या संबंधानें **पूज्यभाव** आणि **वचक** या लोकांस बराच होता; आणि या **आकाश, वायु, प्रकाश, सूर्य** इत्यादिकांच्या नैसर्गिक चमत्कारांवरून त्यांच्या कृतींत **हेतु** हा असलाच पाहिजे असें वाटणें केवळ साहजिक आहे. **प्रगति** आहे तर त्यांत **प्राण** असावा आणि प्राण आहे तेथें शक्ति असलीच पाहिजे, ही समजूत साहजिक होय. ह्मणून त्या शक्तीचा आपल्या बऱ्याकडे उपयोग व्हावा, एतदर्थ **प्रार्थना** व **विनवण्या** केल्या पाहिजेत हीही समजूत मग ओघानेंच येते.

या आपल्या कल्याणाकल्याणाचा संबंध असणाऱ्या शक्तींस आर्यांनीं **देवस्**-देवः-(चकचकणारे किंवा प्रकाशमान) असें सर्वसाधारण नांव दिलें. आणि इकडे आपल्यालाही घरांत एखाद्याच्या स्वाधीन होऊन व त्याला श्रेष्ठपणा देऊन इतरांनीं रहावें लागतें अशी व्यवस्था आहे तशीच या आपणांस पूज्य असणाऱ्या **पंचमहाभूतात्मक** देवांचीही असली पाहिजे, असें अर्थात् वाटणें साहजिक आहे. कारण, ईश्वराला भोगोपचार आपणासारखेच सर्व हवेत, आपल्याला मिष्टान्न आवडतें, तसेंच त्यालाही आवडतें, आपल्याला क्रिया कराव्या लागतात किंवा देहविधी आहेत तसे ईश्वरालाही (एकदोन शिवायकरून मात्र), आहेत अशी समजूत आमच्या मनांत ठाम भिनलेली आजमितीलाही दिसते. भाविक हिंदूंच्या देवांला आजमितीलाही शयन हवें; झोंपेंतून उठवावें लागतें; स्नान पाहिजे; पोषाख हवा; अलंकार पाहिजेत; बाळवाटी, तहानलाडू, मुख्य भोजन, हीं लागतात, ही समजूत व त्याचप्रमाणें आचरण सर्वत्र आढळतें. कारण, भक्तीच्या प्रारंभिक भावना अशाच असणें शक्य आहे.

ह्मणून आर्यांनीं देव मानिले त्यांचें एखादें कुटुंब असावें व त्यांचा कोणी घरधनी एक असला पाहिजे असें साहजिकपणें मानिलें आणि त्याला **द्युपितर**–ह्मणजे देवाचा पिता–(याचाच अपभ्रंश तिकडे युरोपखंडांत ज्युपिटर असा झाला असें ह्मणतात.) आणि भिन्न भिन्न कार्यांचें कर्तृत्व भिन्न भिन्न पुरुषांकडे असावें अशी कल्पनाही केवळ साहजिक आहे. त्यामुळें **आकाशसंबंधीं** कार्यें घडविणारा देव **वरुण**, असें त्यांच्या मनानें घेतलें. हा आपल्या प्रार्थना ऐकतो आणि आपल्या कल्याणाकल्याणाची या **वरुणाला** काळजी आहे अशी त्यांची समजूत होती. जमीन पिकविणें, धनधान्यादि समृद्धि करणें, हीं कार्यें **सूर्य** करीत असावा असें **आर्यांस** वाटे व ह्मणूनच त्याला **मित्र** असें ते समजत. अर्यमन् असें सूर्याला ह्मणण्याचाही सांप्रदाय आर्यांचा होता.

एवढ्यावरच आर्य तृप्त नव्हते. अग्नि, उषा, इडा, यांचीही देवतांत त्यांनीं गणना केली.

येणेंप्रमाणें आर्य लोकांच्या देवसंबंधी कल्पनांचा इतिहास आहे. प्रार्थना, क्षमा मागणें, प्रीति संपादण्यास्तव भक्ष्य, भोज्य, पेय, इत्यादिकांचें त्यांस समर्पण करणें, हीं भक्तीचीं अर्थात् देवाच्या प्रीतीचीं मूळारंभींचीं साहजिक लक्षणें होत. राजा, बाप, गुरु, स्नेही, उपकारकर्ता, आणि आपल्या घरीं आलेला पाहुणा, इत्यादि नातींही त्यांनीं या देवांच्या ठिकाणीं कल्पिलीं आणि त्या त्या नात्याप्रमाणें त्यांच्याशीं **आर्य** वागत.

**३ मंत्रः**–देव ह्मणून ज्या वस्तूंत आर्यांची भावना बसली त्यांची प्रार्थना करणें साहजिकच आहे. त्या प्रार्थनेला **मंत्र** अशी संज्ञा आहे.

**४ छंदः**–ती प्रार्थना अथवा ते **मंत्र** नियमित अक्षरमात्रादिकांत ह्मणत, त्याला **छंद** असें नांव आहे. वृत्त ह्मणजे छंद असें ह्मटलें तरी चालेल.

५ ऋषिः–वसाहतीसाठीं आलेल्या आर्य लोकांतील **विद्वान्, शहाणे व समंजस** लोकांना **ऋषि** ह्मणण्याचा सांप्रदाय असे.

६ **वेद**:–विद् याचा अर्थ जाणणें. ईश्वरसंबंधी ज्ञानास **वेद** अशी संज्ञा आहे. ऋषींनीं उच्चारलेल्या मंत्रांच्या, प्रार्थनेच्या समूहाला **वेद** असें ह्मणतात.

**७ श्रुतिः**–श्रु ह्मणजे ऐकणें. ऐकलेल्या ईश्वरसंबंधी ज्ञानाला श्रुति ह्मणतात. कळवावयाचें ज्ञान(ईश्वरसंबंधी) याचें नांव **श्रुति.**

**८ स्मृतिः**–स्मरणांत ठेवून इतरांस सादर केलेलें ईश्वरसंबंधी जें ज्ञान तें **स्मृति** होय.

**९ वेदांचा कर्ताः**–ऋषींनीं वेद रचिले असे मानतात व ईश्वरी श्वासाबरोबर हे बाहेर पडले अशीही समजूत आहे. वेद मानवी शक्तीनें केलेले नव्हेत व त्यांचा कर्ता अमुक ह्मणून नाहीं, तर ते **अपौरुषेय** व **ईश्वररचित** अशी आजमितीला धर्माभिमानी लोकांची दृढ समजूत आहे.

**१० वेदांचा कालः**–सुमारें पांच हजार वर्षांच्या पूर्वी वेद होते असें मानण्याचा सांप्रदाय हिंदु लोकांचा आहे. व ख्रिस्ती लोक आपल्या शकापूर्वी फार फार तर दीड हजार वर्षांखालचे वेद होत असें कांहीं खगोलविषयक ज्योतिषशास्त्राच्या आधारें दाखविण्याचा प्रयत्न करितात.

**११ वेदांतील त्रिमूर्तिः**–तीन ही संख्या आर्य लोकांच्या फार आवडीची दिसते. कारण, सर्वांचे तीन वर्ग केलेले आढळतात. तीन लोक, तीन काळ, तीन मूर्ति, इत्यादि. वेदांतील देवतांत **तीन देवता** अत्यंत प्रमुख. त्या ह्याः–

**१२ अग्निः**–(पृथ्वींतला) हवेंतला-**इंद्र** आणि आकाशांतला **सूर्य**–ह्मणजे **पृथ्वी, वायु** आणि **आकाश** या तीन्हींतला एकेक–असे तीन मुख्य देव आर्यांचे होत. याला "भूर, भुव, स्वर" असें

ह्मणत आणि ह्याच **त्रिमूर्ती** ह्मणजे ॐ **ओमचा** अर्थः– अ, उ, म अशीं तीन अक्षरें मिळून ॐ शब्द झाला आहे. अग्नि, वायु–किंवा वरुण–इंद्र अर्थां–आणि मित्र–सूर्य–या तीन देवतांचीं आद्याक्षरें अ, ऊ, म अशीं आहेत. ह्मणून ओम्, आणि ते कोणते तर भूर भुव स्वर असा कोणी कोणी तर्क करितात. हिंदुलोकांत ॐपेक्षा अन्य पवित्र शब्द नाहीं.

**१३ इंद्र हा देव; मरुत्** व **वायु** आणि **रुद्र** हे इंद्रशब्दवाचकच होत अथवा इंद्रांतले हे पोटभेद किंवा त्याचे मित्र कल्पिले असावेत. त्याचप्रमाणें **वरुण** आणि **मित्र** व **विष्णु** हे **सूर्य** अथवा **सावित्री** किंवा **पूषा**–यांचेच पोटभाग किंवा हे आणि ते एकच असें मानण्याचा आर्यांचा प्रघात होता. **उषा** हाही सूर्यांतलाच एक भेद असें समजत. **अश्विनी** (आकाशांत चकाकणारीं दोन नक्षत्रें) हीं त्याचीं अवळीं जुवळीं मुलें असेंही मानीत असत.

आतां **अग्नि** ही देवता पृथ्वीवरली असें मानण्याला अरणी–अंजिराचें लांकूड याच्या घर्षणानें त्याची उत्पत्ति व घरोघर त्याचें वास्तव्य आढळणारें हें कारण होय. शिवाय आकाशांतील देवतांपेक्षां **अग्नीचें** सान्निध्य निकट व साक्षात्कारही प्रत्यक्ष. तेव्हां त्यांनीं त्याला–अग्नीला–आकाशांतील देवांशीं मध्यस्थी करण्याला व त्यांना अर्पण केलेले पदार्थ पोंचविण्याच्या कामीं योजिलें हें ठीकच आहे. " हव्यवाहन " हें अग्नीचें कर्तव्य आर्यांनीं या कारणांवरून कल्पिलें असें दिसतें.

## वेदांविषयीं जास्त माहितीः–

**एकंदर वेद चारः**—त्यांचीं नांवें १ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद आणि ४ अथर्व वेद.

**१४ वेदांचे विभाग**:—१ मंत्र, २ ब्राह्मण, व ३ उपनिषद्, असे प्रत्येक वेदाचे **तीन विभाग** असतात.

मंत्रसमूहाला **संहिता** हें नांव आहे.

**मंत्र** आणि **ब्राह्मण** यांला श्रुति असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. **उपनिषदें** ब्राह्मणांस जोडलेलीं परिशिष्टें होत. व त्यांत वेदांचा अर्थ सांगितलेला असतो.

**१५ ऋचा**:—ऋग्वेदाच्या मंत्रास ऋचा असें ह्मणतात.

**१६ सूक्तः**—ह्मणजे स्तोत्र.

**१७ ब्राह्मणः**—या वेदाच्या भागांत मंत्राचा व सूक्तांचा उपयोग कसा करावा इत्यादिकांसंबंधाचे नियम, यज्ञांची उत्पत्ति व तत्संबंधी कथा, वगैरे विवरण आहे.

**१८ ऋग्वेदः**—हा पहिला वेद. त्यांत १०१७ मंत्र आहेत व एक लक्ष त्रेपन्न हजार आठशें सव्वीस शब्द त्यांत आहेत, असें ह्मणतात.

**१९ यजुर्वेदांत** यज्ञ व तत्संबंधी मंत्र यांचाच भरणा आहे. ऋग्वेदांतील पुष्कळ भाग यजुर्वेदांत येतो. नानातऱ्हेचे यज्ञ व त्यांच्या क्रिया यांचें विवेचन यजुर्वेदांत आहे.

**२० सामवेदः**—"सोमवल्लीच्या" स्तुतीनें भरलेला आहे. या वेदांत ऋग्वेदाचाही पुष्कळ भाग येतो.

**२१ अथर्ववेदः**—हा सर्वांत आलीकडचा ह्मणजे वयोमानानें कनिष्ठ वेद होय. स्वतःवरील अरिष्टें आणि शत्रूंचें निवारण यांजविषयीं यांत पुष्कळ विवरण केलें आहे. ऋग्वेदांतले मंत्र यांतही पुष्कळ आहेत.

**२२ वेदांच्या शाखा**:—पोटभेदांवरून व अनुयायी यांच्या तटामुळें वेदांच्या शाखा अस्तित्वांत आल्या. वेदांच्या संहितेलाही शाखा हा पर्यायशब्द आहे.

**२३ ऋग्वेदाच्या शाखा पांच**:–१ शाकल, २ बाष्कल, ३ आश्वलायन, ४ सांख्यायन, व ५ मांडूकायन.

**२४** यजुर्वेदाच्या **शायशीं** आहेत, सामवेदाच्या एक हजार. यावरून आर्यांच्या पुढल्या पुढल्या पिढींत बरेच तट पडून गेले असें दिसतें. कारण, शाखाभेद वाढते आहेत व त्या त्या शाखांचे भेद एकमेकांचे कट्टे निंदक दिसतात, इतकेंच नव्हे, तर शाखांतर करणें अत्यंत निषिद्ध मानून त्या पातकाला शिक्षाही बरीच कडक अशी आहे.

**२५ ब्राह्मणें**:–वेदमंत्रांचे विधि व अर्थ यांचा विशेष विचार करणारा वेदांचा भाग याला ब्राह्मण ही संज्ञा आहे. प्रत्येक वेद-संहितेचीं ब्राह्मणें आहेत.

ऋग्वेदाचीं **ऐतरेय** व **कौषीतकी** अशीं दोन ब्राह्मणें. यजुर्वेदाचीं **तैतिरीय** व **शतपथ** ब्राह्मणें. सामवेदाचीं आठ ब्राह्मणें आहेत. यांत **तांड्य, महाब्राह्मण** व **प्रौढ ब्राह्मण** हीं मुख्य होत. अथर्व वेदाचें **गोपथ** ब्राह्मण.

**२६ उपनिषदें व आरण्यकें**:–उपनिषदें हा वेदांचाच भाग होय. यांत आत्मविचार असतो. वेदांत प्रार्थना, ब्राह्मणांत कथा व कर्मविधी आणि उपनिषदें व अरण्यकें यांत आत्मानात्म-विचार असतो. आणि उपनिषद् याचा अर्थ जन्ममरणाचा पाश तोडून टाकिते ह्मणजे मोक्ष देते ती असा आहे.

**आरण्यकें** उपनिषदांचाच एक भाग होय. अरण्यांत बसून विचार करण्याचे हे विषय, ह्मणून यांस आरण्यकें असें नांव पडलें असावें.

**२७ उपनिषदांतील विषय**:–ईश्वर, मनुष्य, धर्म, सृष्टि, इत्यादिकांचा यांत ऊहापोह केलेला असतो. हीं उपनिषदें अडी-

चर्शेहून अधिक आहेत. ऋग्वेदाचीं ऐतरेय व कौषीतकी; यजुर्वेदाची तैतिरेय; सामवेदाचीं केन व छांदोग्य व अथर्ववेदाचीं मांडुक्य व कठ अशीं उपनिषदें आहेत.

**२८ वेदांतील देवता:**—हल्लीं पुराणिक काळांत **गणपति** प्रत्येक बाबतींत आणि प्रथम पूजावा लागतो, तसें वैदिक काळांत **अग्नीचें** माहात्म्य होतें. वैदिक काळांत एकंदर देव तेहतीस. **उषा** व **पृथ्वी** या देवी. आणि त्या देवतांची प्रीति संपादणें किंवा आराधना करणें ती यज्ञयागद्वारेंच. ह्मणजे वैदिक काळांत **यज्ञ** व **निसर्गदेवता** यांचेंच कायतें माहात्म्य असे.

**२९ देवकोटी:**—पृथ्वी, आकाश, आणि हवा या तिन्हींत लहानमोठ्या मिळून अकरा अकरा याप्रमाणें तेहतीस देवता. कोटि याचा अर्थ जात किंवा प्रकार असा संस्कृतांत आहे; त्यामुळें तेहतीस कोटि देवता ह्मणण्याचा प्रघात पडला. पण अज्ञानामुळें शंभर लक्षांचा एक कोटि हें संख्याशास्त्र **तेहतीस कोटि** येथें लढविण्याचा प्रचार पुष्कळ ठिकाणीं हल्लीं आढळत आहे. तें असो.

**३० ईश्वरसंबंधी कल्पना:**—मनुष्यप्राण्याच्या मनांतील ईश्वरसंबंधी ज्ञानाची परिपूर्णता, **भीति, आदर** आणि **विचार** अशा क्रमानें होत जाते. हा सिद्धांत आर्यांच्या धर्माभिवृद्धीवरून चांगला व्यक्त होतो. ह्मणजे ईश्वरविषयक कल्पना प्रथमतः भीतीपासून निघते, व ईश्वराचें चिंतनही त्या भीतीच्या प्रमाणावर अवलंबून असतें. कैक लोक ईश्वर ईश्वर ह्मणून त्याच्या नादीं लागतात, याचें कारण आपल्यावर त्याचा केव्हां कसा रोष होईल न कळे! व आपल्यावर त्याचा कोप होऊं नये याच हेतूनें, हें आजमितीसही कोणाला नाकबूल करितां यावयाचें नाहीं. किंवा ईश्वरप्रेमाचें अगर

त्याच्या सेवेचें आदिबीज, स्वहितदृष्टि आणि स्वहितास धक्का बसेल ही बुद्धि येथेंच असतें. याच्यावरील पायरी **आदरबुद्धि.** असलें हें अवाढव्य जग आणि इतक्या परिपूर्णपणानें अबाधित चालविणाऱ्या जगन्नियामकाच्या अचाट बुद्धीचें कौतुक पाहून थक्क होणें व त्याजबरोबर त्या अखिलब्रह्मांडनायकाच्या चरणीं लीन होणें किती सहाजिक आहे हें कांहीं कोणास सांगावयाला नको. आणि याच्यावरील पायरी विचारशक्तीची. आपण कोण, आलों कोठून, आपल्याजन्माचा हेतु काय? इत्यादि विचारांत गुंग होऊन, कोठें तरी सोय सांपडावी एतदर्थ सच्चिदानंदाच्या निर्गुण, निर्विकल्प, निराकार स्वरूपांत मनास गुंगविणें ही शेवटली पायरी होय. या मानानें पाहतां आर्यलोकांच्या ईश्वर व धर्मसंबंधी कल्पनांचा उगम वर सांगितला या क्रमानें होत गेला तर त्यांत कांहीं विशेष नवल नाहीं.

**३१ धर्मग्लानिः**—वेदांत सांगितलेले यज्ञ, याग व यांनीं मानलेल्या निसर्गात्मक तेहतीस कोटि देवता यांच्या प्रार्थना हाच आह्मां आर्यांचा प्राथमिक धर्म होता. व दिवसेंदिवस त्याचें मान वाढत्या प्रमाणावर असे. सोमनामक मद्य, नानातऱ्हेच्या पशूंच्या वधाचे यज्ञ आणि वेदांतील ऋचांचा अहर्निश घोष, एवढींच इतिकर्तव्यता, अशांतच कांहीं काळ लोटला. इतक्यांत, पशूंचा वध करून ईश्वरी कृपा संपादणें अत्यंत गौण, अशा समजुतीचे कांहीं जण निघाले. आणि बौधधर्मप्रस्थापक **गौतमबुद्धाला** ही यज्ञाची खटपट व्यर्थ आणि परमेश्वरप्राप्तीचे मार्ग अप्रशस्त असें वाटूं लागलें आणि त्याप्रमाणें आर्यांच्या यज्ञयागादि धर्मावर बौद्धांची मोठी जबरदस्त लाट कोसळली. **कुमारिल भट्टाचा** अवतार होऊन वैदिकमार्गाचें आणि वैदिकधर्माचें पुनः यथापूर्वरूप प्रस्थापित होईपर्यंत आर्यांच्या वैदिक धर्माला पराकाष्ठेची

ग्लानि आली. ती इतकी कीं, अग्नीला कोठेंच हविर्भाग मिळे-नासा झाला ह्मणून इंद्रादि देव उपाशीं मरूं लागले, अशी ओरड पुराणांतून—त्या काळच्या स्थितीचें वर्णन केलेलें आहे त्यांतून—आढळते.

**३२ आर्यधर्मोद्धारकः**—ह्मणजे सारांश बौद्धधर्माच्या प्रचंड लाटेनें आर्यांच्या धर्मप्रवाहाच्या गतीस भारी मोठा अडथळा केला आणि **कुमारिलभट्ट** व यांच्याच मागोमाग **श्रीमच्छंकराचार्य** यांनीं नव्या जुन्यांच्या तडजोडीच्या मिषानें आर्यधर्माचा, आपल्या अचाट बुद्धिप्रभावानें चांगलाच जीर्णोद्धार केला. इतकेंच नव्हे, तर रानडुकराच्या मुसांडीसारख्या आवेशानें आर्यधर्मावर चवताळून आलेल्या **बौद्धांस** या देशांतून काळें तोंड करण्याचा प्रसंग आणिला. वादविवादाच्या पोटीं हार जाणारांस अत्यंत सदय अंतःकरणानें **कुमारिलभट्ट** व **शंकराचार्य** वागवीत, तें इतकें कीं, त्यांस आपल्या लाडक्या शिष्याचें पद देत. पण निवळ दुराग्रहानें आंधळे बनलेल्यास, राजाश्रयाच्या जोरावर **कुमारिलानें** तेल्याच्या घाण्यांत घालून रगडून पिळून काढविलें. व **शंकराचार्यांनीं** देहान्त शासन करविण्यास कमी केलेलें नाहीं. धर्मसंबंधी प्रतिस्पर्धी यांस सौम्य आणि कडक रीतीनें वागविण्याची कमाल **कुमारिल** व **शंकराचार्य** या दोघां अवतारी व लोकोत्तरबुद्धीच्या धर्मोद्धारकांत सारखी असे. **श्रीमच्छंकराचार्यां**सारखा अलौकिक बुद्धीचा व वाग्युद्धांत कदापि व कोणासही हार न गेलेला अप्रतिम विद्वान् अद्यापपर्यंत एकंदर जगांतील कोणत्याच देशांत होऊन गेला नाहीं, ही गोष्ट दिनदुनयेला मान्य आहे.

कुमारिल व शंकराचार्य यांनीं केलेल्या आर्यधर्माच्या उद्धारांविषयीं पुढील पुस्तकांत लिहिलें आहे.

# विक्रीची पुस्तकें.

## धनुर्धारीकृत पुस्तकें.

**सरकारीरिपोर्टीत** यांची भापा "अगदीं **शुद्ध**-इडियामेटिक.- **आवेशयुक्त** आणि **अभिमानोत्तेजक** असते" असा शेरा आहे.

१ महाराष्ट्रकुंटुवसंग्राह्यपुस्तकावली.

१ मराठ्यांच्या मर्दुमकी भा. १ ला ।≈
२ ,, ,, दुसरा भाग ।≈
३ जवानमर्द ब्राम्हणभाई भा. १ ला ।≈
४ ,, ,, दुसरा भाग ।≈
५ जवानमर्द मराठेगडी भा. १ ला. ।≈
६ ,, ,, भाग दुसरा ·।≈
७ पानपतचा मोहरा ·।-
८ शूर अवला ।≈
९ वीरस्नुषा राधाबाई ।≈
१० फडणीस नाना ·।≈
११ आपल्या देशाचा ल० इतिहास ·।-
१२ मराठ्यांचा पत्रवद्ध इ० मोडी. ·।≈
१३ जवानमर्द ब्राम्हणभाई ३. ।≈
१४ मराठे सरदार-शिंदे ।≈
१५ ,, ,, दाभाडे सेनापति·।-
१६ देवी अहल्यावाई होळकरीण ।≈

२ मापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

१ पैसा कसा मिळेल ·॥·

३ मुलांचें चिमु
१ नीतिधर्मपाठ
२ आपणावरील
३ स्वभाव
४ अभ्यास
५ आजोबाच्या

४ स्वधर्म

१ धर्माची आव

## केरळ

वर्षारंभ

आगाऊ वर्षाची व
हा, प्रतिमहिन्य
रेख व अपूर्व **चित्र**
इतर प्रांत आणि
अलौकिक गुण व
रळ, सोप्या व रसि
करितो. लोकोत्त
देतो. ह्याच्या मनो
हृदयांत गुदगुल्या
रीक्षा निःशंकपणें
णसणीत करतो. ह
बायकामुलांबरोबर,
लतो.

ज.

र

---

हें पुस्तक मुंबईत "निर्णयसागर" छापखान्यांत छाप